**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६ चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश**

जा.क्र.मुंबई/एल विभाग/७७ (अे)(ब)/३९५६/सन २०१७.
उपनिबंधक, सहकारी संथा, एल विभाग, मुंबई, रुम नं.३११
३ रा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापुर,
नवी मुंबई ४०० ६१४. दिनांक :-२६/१२/२०१७.

वाचावे :- १. मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कडील जा.क्र. ४६०५/२०१७ दि.११.०८.२०१७.
२.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (१) (अ)(ब) अन्वये तरतुद
३.प्राधिकृत अधिकारी यांच्या कडील दि.१९.११.२०१७ रोजीचा अहवाल.
४.संस्थेचे पत्र दि.०९.१२.२०१७

ज्याअर्थी, **ऑर्चिड इन्क्लेव्ह को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, सेक्टर आर-३, ऑर्चिड इनक्लेव्ह, नाहर अमरीत शक्ती रोड, चांदीवली , मुंबई ४०० ०७२.** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६ व त्या खालील नियमान्वये नोंदविण्यांत आलेली असुन ती, या कार्यालयाचे कार्यकक्षेत येत आहे. आणि,

ज्याअर्थी, सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम त्या मधील अधिनियम व उपविधीतील तरतुदीनुसार नोंदणीकृत करण्यांत आलेली सहकारी गृहनिर्माण संस्था असुन या कार्यालयाने दिलेले आदेश व निर्देशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेची सभासद संख्या ही २०० पेक्षा जास्त असल्याने सदर संस्थेची निवडणुक घेण्या करीता या कार्यालयातील श्रीमती जयमाला झेवीयर यांनी निवडणुक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यांत आलेली होती. आणि

ज्याअर्थी, निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दि.१९.११.२०१७ रोजी निवडणुक घेवुन निवडणुक निकाल नमुना ई-२ या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर संस्थेच्या सर्वसाधारण मतदार संघातुन १०, महिला राखीव मतदार संघातुन ०२ असे एकुण १२ उमेदवारांची निवडणुकीने निवड झालेली आहे. अनुसुचित जाती/जमाती, इतर मागासवर्गीय मतदार संघ, व विमुक्त जाती/भटक्या जमाती मतदार संघातुन प्रत्येकी १ या प्रमाणे ०३ प्रवर्गातुन नामनिर्देशन पत्र प्राप्त न झाल्यामुळे सदरच्या जागा रिक्त राहिलेल्या आहेत. सदरच्या संस्थेचा उपविधी क्रमांक ११४ नुसार गणपुर्ती ही ०८ सदस्यांची आहे. आणि

ज्याअर्थी, उक्त संस्थेतील निवडुन आलेल्या उमेदवारांपैकी सर्वसाधारण मतदार संघातुन श्री.गौर अनुपम, श्री.अमीन देवराज, श्री.जॅकॉब जॉन, श्री.वेंकटेश अजय, श्रीमीत गौर ज्योती अनुपम अशा एकुण ०५ नवनिर्वाचित समिती सदस्यांनी राजिनामे या कार्यालयास सादर केलेले आहेत. आणि

ज्याअर्थी, उक्त संस्थेने या कार्यालयाचे निदर्शनास असे आणुन दिले आहे की, संस्थेतील ०७ नवनिर्वाचित समिती सदस्यांनी त्यांचे अधिकारात चेअरमन/सेक्रेटरी/ आणि खजिनदार या पदाकरीता निवड केलेली आहे. आणि

ज्याअर्थी, उक्त संस्थेचा उपविधी नुसार गणपुर्ती ही ०८ सदस्यांची आहे आणि आजमितीस उक्त संस्थेचा कारभार हे ०७ नवनिर्वाचित समिती सदस्य करीत आहेत. कार्यरत असणा-या व्यवस्थापक समितीस आवश्यक ती

Scanned by CamScanner

गणपुर्ती असल्याचे दिसुन येत नाही आजमितीस संस्थेवर कोणतीही कायदेशिररित्या गठित समिती कार्यरत नाही. त्यामुळे संस्थेचा दैनंदिन कारभार बंद पडलेला असुन यासाठी नवनिर्वाचित समितीचे गठन होणे आवश्यक आहे.

आणि,

त्याअर्थी, संस्थेमध्ये कोणतीही कायदेशिर रित्या गठित झालेली समिती कार्यरत नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) नुसार संथेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे संस्थेचे दैनंदिन काम करण्यासाठी त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणेसाठी संस्थेची विद्यमान व्यवस्थापक समिती बखास्त करण्यांत येत असुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी संस्थेवर त्वरीत प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे बाबतची कारवाई करणे साठी नोटीस प्रसिध्द करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नसल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, शिरीष सपकाळ, उपनिबंधक, सहकारी संस्था एल विभाग, मुंबई **ऑर्चिड इन्क्लेव्ह को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, सेक्टर आर-३, ऑर्चिड इनक्लेव्ह, नाहर अमरीत शक्ती रोड, चांदीवली , मुंबई ४०० ०७२** या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री.अे. जी. जाधव, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दि.२८/१२/२०१७ रोजी माझे सही व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई

**(शिरीष सपकाळ)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

**प्रत :-**

**१.अध्यक्ष/सचिव, ऑर्चिड इन्क्लेव्ह को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, सेक्टर आर-३, ऑर्चिड इनक्लेव्ह, नाहर अमरीत शक्ती रोड, चांदीवली , मुंबई ४०० ०७२**

**२.श्री.अे.जी. जाधव, (प्राधिकृत अधिकारी)**

यांनी त्वरीत संस्थेच्य दप्तराचा ताबा स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच सदर कालावधीत प्राधिकृत अधिका-याने दैनंदिन कामकाजाव्यतिरीक्त इतर सर्व कामकाजाबाबत निर्णय हे केवळ संस्थेच्या अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्येच घ्यावेत. तसेच उक्त संस्थेची निवडणुक विहित मुदतीत घेणे बाबतची कार्यवाही करावी.

**३. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक मर्यादित/ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्यादित____________ शाखा.**

**४. इतर बॅक ______________________________________________ शाखा.**

**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

Scanned by CamScanner